# ई - पोलीस पत्रिका

दि २७/०२/२०२४ अनु.क्र.३९

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली /प्रशिक्षण/रजा

## बदली

**०१.पोआअ/पशा-३/बालसंगोपन रजा भगत/२०७३/२०२४ अमरावती शहर दिनांक २६/०२/२०२४**

## आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांचे बाळाचे संगोपना करीता विशेष रजा शासननिर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/ प्र.क्रं.२५/सेवा-६, दिनांक २३/७/२०१८ मधील तरतुदीनुसार अटी व शर्तीचे अधिन राहून बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम व ब.नं. व नांव, व नेमणूक | प्रसुतीचा दिनांक | अपत्याची संख्या | कोणत्या अपत्या करीता जन्म दिनांक | मंजुर केलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती शितल गुणवंतराव भगत, वरिष्ठ श्रेणी लिपीक | दि.२३/०८/२००७<br>दि.१७/११/२००८ | २ | दुस-या अपत्य दि.१७/११/२००८ | दि.२८/०२/२०२४ ते दि.२८/०३/२०२४ एकुण ३० दिवस |

**अटी व शर्ती :-**

१. मुलाचे वय १८ वर्षे होई पर्यंत सदर रजा लागु राहील.

२. एका वर्षामध्ये कमाल २ महिन्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

३. पहिल्या दोन जेष्टतम हयात मुलांकरीता सदर रजा लागु रहील.

४. उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढीच रजा वेतन देण्यात येईल.

५. सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरनार नाही.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

## शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-१/अंतिम आदेश/पोशि-१६८१ टिकार/१५७९/२०२४अमरावती शहर दि.१३/०२/२०२४**

# <u>आदेश</u>

**कसुरदाराचे नाव** :- पोशि/१६८१ चेतन रमेशराव टिकार, नेमणूक - पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही कसूरदार पोशि/१६८१, चेतन रमेशराव टिकार,पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून दिनांक १२/०१/२०२३ रोजी सायंकाळी ०७.१५ वा. दरम्यान दारुच्या नशेत चार चाकी वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून अपघात केला, फिर्यादी नामे सतबीरसिंग अरोरा वय ४५, लकडगंज, बडनेरा अमरावती, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पो.स्टे. बडनेरा येथे अप क्रं. ४७/२०२३ कलम २७९, ३३७, ३३८ भादवि सहकलम १८५ मोटर वाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यांत आला आहे, तसेच सदर घटनेबाबत दिनांक १३/०१/२०२२ रोजी विविध वृत्तपत्रात व प्रसार माध्यमांमध्ये पोलीस कर्मचा-यांचे दारुचे नशेत वाहन चालवून तीन वाहनाला उडविले या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली आहे.

तुम्ही पोलीस विभागात अत्यंत जबाबदार पदावर काम करीत असून शिस्तप्रिय पोलीस खात्याला न शोभणारे वर्तन केले आहे.तुम्हास आपल्या कर्तव्याप्रती कोणतेही गांभीर्य नाही.प्रस्तूत प्रकरणी तुमची विभागीय चौकशी केली असता तुम्ही उपरोक्त प्रमाणे कसूरदार असल्याचे विभागीय चौकशीत सिध्द झाले आहे.तुमच्या अशा बेजबाबदार व बेशिस्तपणाचे व अशोभनिय वर्तनाबाबत उपरोक्त कसुरी प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार**पुढील देय वार्षीक वेतन वाढ ३ (तीन) वर्षाकरीता(अपरिणामकारक)का रोखण्यात येवु नये?**म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली.सदर नोटीस तुम्ही दिनांक ०९/११/२०२३ रोजी स्विकारुन त्यावर दिनांक ०५/१२/२०२३ अन्वये तुम्ही लेखी स्पष्टीकरण सादर केले.तत्पुर्वी तुम्हास दिनांक ३०/०१/२०२४ रोजी मा.पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले असता ते समाधानकारक दिसून आले नाही.परंतु तुम्हांस पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेली प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

## <u>अंतिम आदेश</u>

उपरोक्त कसुरीप्रकरणी पोशि/१६८१ चेतन रमेश टिकार, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (४) चे तरतुदी नुसार **रु.१०००/- आर्थिक दंडाची शिक्षा** देण्यांत येत आहे.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

**०२.पोआअ/विचौ-२/कसुरी/चौकशी अहवाल/अंतिम आदेश/सपोनि-साळोखे/१९८९/२०२४अमरावती शहर दिनांक २२/०२/२०२४**

**संदर्भ क्रमांक :-** १) पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे कडील जावक क्रमांक पो.आ./चौकशी अहवाल/सपोनि-साळोखे/२०२३-२४५ छत्रपती संभाजीनगर, दिनांक ०१/१२/२०२३

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/ का.दा.नो./सपोनि-साळोखे/३३/२०२४ अमरावती शहर,दिनांक ०१/०१/२०२४

**कसुरदारचे नाव :-** श्री. प्रमोद साळोखे, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुक पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही श्री प्रमोद साळोखे, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुम्हाला दिनांक १५/०९/२०२३ ते १७/०९/२०२३ दरम्यान मंत्रीमंडळ बैठकीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर येथे बंदोबस्तकरीता रवाना करण्यात आले होते. स्मार्ट सिटी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे बंदोबस्त नेमुन दिला असता. दिनांक १६/०९/२०२३ रोजी बंदोबस्त दरम्यान मंत्रीमंडळ बैठकीस आलेले मा.मुख्य सचिव व मा.अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांची गाडी अडवुन बैठकीच्या नमुद वरिष्ठांना गाडीसह बैठकीच्या ठिकाणी सोडले नाही व अपशब्द वापरले वरुन कसुरी अहवाल प्राप्त झाला आहे.

एकंदरीत घटनास्थळावरुन स्मार्ट सिटी कार्यालयात गेल्यानंतर मा.मुख्य सचिव यांनी डयुटीवरील अधिकारी यांनी उध्दट बोलले बद्दल जो आक्षेप नोंदविला त्यात सत्यता असल्याचे तसेच मा.मुख्य सचिव व मा.अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांचेसोबत झालेल्या गैरवर्तनाच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी केलेल्या चौकशी दरम्यान संबंधीत अधिकारी यांच्या जबाबाचे अवलोकन केले असता तुम्ही पुढील प्रमाणे कसुरी केली असल्याचे चौकशी दरम्यान दिसुन आलेले आहे.

१) सदर घटनेच्या ठिकाणचे उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजचे अवलोकन केले असता मा.मुख्य सचिव व मा.अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांचे वाहन बॅरीकेट जवळ आल्यानंतर तेथे तैनात असलेल्या पोलीस अंमलदार यांनी मा.महोदयाचे वाहन पुढे घेण्यासाठी हाताने इशारा करतांना दिसत होते. त्याचवेळी तुम्ही सदर वाहना जवळ गेल्याचे दिसुन येत आहे. त्यावेळी तुम्ही सदर वाहनामध्ये कोण अधिकारी बसलेले आहे वाहनावर कोणते पास लागले आहेत हे पाहुन पुढील कार्यावाही करणे आवश्यक होते, परंतु सदर वेळी तुम्ही उच्च पदस्थ अधिका-यासोबत काहीतरी संभाषण करीत असल्याचे दिसुन येते तसेच त्यांचे देह बोलीतुन ते सन्मानपुर्वक बोलत होते असे उपलब्ध असलेल्या सीसीटीव्ही फुटेज वरुन वाटत नसल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

२) मा.मनोज सौनिक, मुख्य सचिव व श्रीमती सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव (गृह विभाग) हे गाडी मध्ये असले बाबत श्रीमती मनिष दांडगे, उपजिल्हाधिकारी (रोहियो), जालना (मा.अपर मुख्य सचिव गृह यांच्या समन्वय अधिकारी) यांनी सांगितले नंतर त्यांचे वाहन मुख्य बैठकीच्या ठिकाणी सोडणे अपेक्षीत होते. परंतु तुम्ही तसे न करता बंदोबस्ताच्या ठिकाणी हजर असलेल्या वरीष्ठ अधिकारी यांना देखील त्याबाबत कुठलीही कल्पना न देता आप मर्जीत मा.मुख्य सचिव व मा.अपर मुख्य सचिव (गृह विभाग) यांचे वाहन मुख्य बैठकीच्या ठिकाणी न सोडल्याचे दिसुन आलेले आहे.

३) मंत्रीमंडळ बैठकीच्या ठिकाणी सदरची घटना घडल्या नंतर मा.मुख्य सचिव साहेबां सोबत केलेल्या उध्दट वर्तना बाबत मा.पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी सदर ठिकाणी हजर असलेले अधिकारी यांना बोलावुन घेवून मा.मुख्य सचिवांकडे स्वत: सोबत घेवुन गेले. त्यामध्ये पोलीस निरिक्षिक श्री रामेश्वर गाडे, पोलीस निरिक्षिक गाणोरकर (PTS जालना) व पोउपनि श्री रोकडे (नाशिक जिल्हा) असे मा.मुख्य सचिवांकडे गेले. परंतु तुम्ही सदरची घटना समजताच ते कर्तव्याच्या ठिकाणावरुन काही काळ निघुन गेल्याचे व सदर घटनेच्या अनुषंगाने वातावरण शांत झाल्यानंतर कर्तव्यावर पुन्हा हजर झाल्याचे निदर्शनास आलेले असुन सदरचे वर्तन हे मा.मुख्य सचिव साहेबां सोबत केलेल्या उध्दट वर्तनाच्या घटनेस पुष्टी देणारे आहे.

४) तुम्ही सदर घटनेच्या अनुषंगाने दिलेल्या जबाबात बरेचशे मुद्दे तथ्यहीन असुन त्याला कुठलाही आधार नाही. तसेच तुम्ही पोलीस खात्यातील एक जबाबदार पदावर कार्यरत असुन तुम्हाला तुमच्या पदाचे व कर्तव्याचे पुर्णत: ज्ञात असुन देखील तुम्ही कर्तव्यामध्ये कसुरी केलेली असल्याचे चौकशमध्ये दिसुन आलेले आहे. अशाप्रकारे मा.मुख्य सचिव व अपर मुख्य सचिव (गृह विभाग), अशा उच्च पदस्थ असलेल्या अति वरीष्ठ अधिका-यांची वाहने अडवुन गैरवर्तणुक करुन तुम्ही तुमच्या पदास अशोभनिय असे वर्तन केलेले असल्याचे दिसुन आलेले आहे. तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुन वरिष्ठ अधिकारी यांनी तुम्हाला दिलेल्या सुचनांकडे दुर्लक्ष करुन तुम्ही तुमचे कर्तव्यात हलगर्जीपणा/निष्काळजीपणा करुन कसुर केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (५) चे तरतुदी नुसार पुढील देय वार्षीक वेतन वाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणामकारक) का ? रोखण्यात येवु नये म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही दिनांक ०८/०१/२०२४ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तरी तुम्हाला दिनांक १६/०२/२०२४ रोजी तुमचे प्रत्यक्ष मौखीक म्हणणे ऐकुण घेण्याकरीता मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षेत गैरहजर राहिले.तुम्ही सादर केलेल्या स्पष्टीकरण्याचे अवलोकन केले असता सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्तीक व समाधानकारक न वाटल्याने कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये दिलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरी बाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ पोटनियम (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **"पुढील देय वार्षीक वेतनवाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणामकारक) रोखण्याची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखे पासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**३.पोआअ/विचौ-२/कसुरी/चौकशी अहवाल/अंतिम आदेश/वश्रेलि-कुरवाळे/२०३०/२०२४अमरावती शहर दिनांक २३/०२/२०२४**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे ज्ञापन क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/खुलासा/वश्रेलि-कुरवाळे/५१/२०२४ अमरावती शहर, दिनांक १५/१२/२०२३

**कसुरदार :-** श्री. नामदेव गोपाळराव कुरवाळे, वरिष्ठ श्रेणी लिपीक, तत्का. नेमणुक लेखा शाखा (सध्या नेमणुक अर्ज शाखा), पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर.

**दोषारोप :-**

श्री नामदेव गोपाळराव कुरवाळे, वरिष्ठ श्रेणी लिपीक, तत्का.नेमणुक लेखा शाखा (सध्या नेमणुक अर्ज शाखा), पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर तुम्हास याव्दारे कळविण्यात येते की, या कार्यालयाचे आस्थापनेवरील लेखा शाखा येथे कर्तव्य बजावत असतांना प्रफुल नारायण वडतकर, ब.नं.३८० यांचे अपघात विमा दावा निकाली काढण्याबाबत तुम्ही वरिष्ठांकडे टिपणी सादर केलेली असुन, सादर केलेल्या टिपणीचे अवलोकन केले असता, दिवंगत प्रफुल्ल नारायण वडतकर माजी पोना/३८० यांचा सन २०१७ मध्ये रस्ता अपघाता मध्ये मृत्यु झाला. त्यांचा अपघात विमा दावा दि न्यु इंडिया ईश्युरन्स कंपनी, पुणे यांनी नाकारला आहे. तत्कालीन पोलीस कल्याण शाखा, अमरावती श्री गजानन गुल्हाणे यांनी स्वत: पुणे येथे जाऊन दाव्या विषयी चौकशी करुन त्याबाबत अहवाल जावक क्र. पोआअ/पोकनि/पो अपविमा/१४०/२०२३, दिनांक ०८/०५/२०२३ रोजी या कार्यालयास सादर केला आहे.

सदरचा अहवाल पोलीस कल्याण लिपीक म्हणजे तुमच्या कडे दिनांक १०/०५/२०२३ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यावर वेळीच टिपणीवर कार्यवाहीसाठी सादर न करता स्वत:कडे प्रलंबित ठेवला. मयताची पत्नी कार्यालयात विचारणा करण्यास आल्यानंतर पोलीस निरीक्षक, कल्याण शाखा यांनी दिलेला दिनांक ०८/०५/२०२३ चा अहवाल ०७ (सात) महिण्याचे प्रदिर्घ विलंबाने आता टिपणीवर सादर केला आहे. या दाव्याचे प्रकरणी विधी अधिकारी यांचे सल्यानुसार लोकपाल तक्रार निवारण समिती यांचेकडे दावा निकाली काढण्यासाठी प्रकरण दाखल करुन पाठपुरावा करण्याचे सुचविले आहे. त्यानुसार लोकपाल तक्रार निवारण समितीकडे विधी अधिकारी यांचे सल्याने, दावा निकाली न काढल्या बदल दि न्यु इंडिया ईश्युरन्स कंपनी, पुणे यांचे विरुध्द तक्रार दाखल करण्याचे आणि तुम्ही ०७ महिने अहवाल तुमच्या कडे प्रलंबित ठेवल्याचे तुम्ही तुमच्या कर्तव्यामध्ये टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी दिलेल्या सुचना कडे दुर्लक्ष केले आहे. तरी तुमच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नियम ६ चा उपनियम (२) च्या तिस-या प्राधिकानुसार मला प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन त्या नियमातील नियम १० अन्वये कारवाई करण्यात येत आहे. त्या गैरशिस्तीच्या किंवा गैरवर्तणुकीच्या कारणास्तव महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नियम ५ मधील तरतुदीनुसार तुमच्या विरुध्द शिस्तभंगा विषयी कारवाई का करण्यात येवु नये ?म्हणुन ज्ञापन देण्यात आले होते.सदरचे ज्ञापन तुम्ही स्विकारले असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तरी तुम्हाला दिनांक ३०/०१/२०२४ रोजी मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलावुन तुमचे मौखीक म्हणणे ऐकुण घेतले असुन व सादर केलेले स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्ही मौखीक म्हणणे सांगीतलेले व तुम्ही सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्तीक व समाधानकारक न वाटल्याने खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

नमुद कसुरदार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नियम ५ चे खंड (१) मधील (चार) तरतुदीनुसार **पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता) रोखण्याचे शिक्षेचे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ४५ दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वार्षीक वेतनवाढ

**१.पोआअ/आस्था-वेनिलि/१ जुलै काल्प.वे.वाढ/१९९३ /२०२४अमरावती शहर दिनांक २२/०२/२०२४**

## आदेश

शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेतन-२०२३/प्र.क्र.१३/सेवा-३, दिनांक २८.०६.२०२३ अन्वये जे पोलीस अधिकारी/अंमलदार दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत व ज्यांनी मागील १२ महिन्यांची आर्हताकारी सेवा पुर्ण केली आहे, अशा सर्व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/अंमलदारांना दिनांक ०१ जुलै रोजीची काल्पनिक (Notional) वेतनवाढ विचारात घेऊन त्यांचे सेवानिवृत्ती वेतन व इतर सेवानिवृत्तीविषयक लाभ सुधारीत करण्यात यावेत; तसेच सदर लाभ सुधारीत करण्यात आल्यानंतर सदर कर्मचा-यांनी अर्ज दाखल केलेल्या दिनांकाच्या मागील ०३ वर्षाची थकबाकी अथवा त्यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक यापैकी जे कमी असेल तितकी थकबाकी देण्यात यावी; अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन परिपत्रकानुसार या कार्यालयाच्या आस्थापनेवरील दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या सोबतच्या विवरणपत्रात नमूद पोलीस अंमलदार यांना दिनांक ०१ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ मंजूर करण्यात येत आहे. तसेच दिनांक ०१ जुलैच्या काल्पनिक वेतनवाढीसह सदर विवरणपत्रात नमूद पोलीस अंमलदार यांचे नावासमोरील **स्तंभ क्र.०७** मध्ये नमूद केलेले वेतन विचारात घेऊन त्यानुसार सेवानिवृत्तीवेतन,सेवानिवृत्ती उपदान,रजा रोखीकरण आणि सेवानिवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण सुधारीत करण्यात यावे. सुधारीत सेवानिवृत्तीवेतनाच्या थकबाकी अनुज्ञेयतेचा कालावधी विवरणपत्रात **स्तंभ क्र.०९** मध्ये नमूद करण्यात आला आहे. त्यानुसार सदर कालावधीत सेवानिवृत्तीवेतनाच्या फरकाची थकबाकी अदा करण्यात यावी.

सदर काल्पनिक वेतनवाढीनुसार सुधारीत केलेल्या सेवानिवृत्तीवेतन उपदान,रजा रोखीकरण आणि सेवानिवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण या सेवानिवृत्तीवेतनविषयक लाभांच्या फरकाची थकबाकी यापूर्वी अदा करण्यात आलेल्या रकमेशी समायोजीत करुन अदा करण्यात यावी.

**सोबत :- विवरणपत्र**

**विवरणपत्र**

**दिनांक 30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अंमलदार यांना दिनांक 01 जुलै रोजीची काल्पनिक (NOTIONAL) वेतनवाढ मंजूर करणे बाबत.**

| अ.क्र. | पदनाम व बक्कल क्रमांक | दि. 30 जून रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त पोलीस अंमलदाराचे नाव | सेवानिवृत्तीचा दिनांक | सेवानिवृत्तीच्या दिनांकाची वेतनश्रेणी | सेवानिवृत्तीच्या दिनांकाचे वेतन | दि.01 जुलै रोजीच्या काल्पनिक वेतनवाढीनंतर सेवानिवृत्तीच्या दिनांकाचे वेतन | अर्ज सादर केल्याचा दिनांक | सुधारीत सेवानिवृत्तीवेतनाची थकबाकी अनुज्ञेयतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | सपोउपनि/ 744 | विनायक श्रीराम धुरंधर | 30.06.2021 | एस-10 : 29200-92300 | रु.45400/- | रु.46800/- | दि. 13.02.2024 | दि. 01.07.2021 ते दि.12.02.2024 |

## संकीर्ण

**१.पोआअ/पशा-५/शास.निवासस्थान वाटप/१९५८/२०२४अमरावती शहर दिनांक २२/०२/२०२४**

# आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील पोलीस अधिकारी हया पोलीस आयुक्त, अमरवती शहर या घटकात दि.२१/०२/२०२४ रोजी म.पुर्व हजर झालेल्या आहेत. त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे शासकिय निवासस्थान मंजुर करण्यात येत आहे. निवासस्थानाचे वाटप खालील पोलीस अंमलदार यांना विहित नमुन्यात दिलेल्या माहीतीवर आधारीत असुन त्यांची आयुक्तालयाच्या बाहेर बदली झाल्यास त्यांनी निवासस्थान त्वरित सोडले पाहीजे व या कार्यालयात तशी लेखी सुचना दिली पाहीजे या अटीवर देण्यात येत आहे.

निवासस्थान वाटपाचे आदेश निघाल्यापासुन संबंधीतांनी ०७ दिवसाचे आत निवासस्थान ताब्यात घेतले पाहिजे किंवा तसे या कार्यालयास कळविले पाहीजे. निवासस्थानाचे विद्युत देयकाचे भुगतान कर्मचा-यांनी वेळीच केले पाहीजे व त्यासाठी ते स्वत: जबाबदार राहतील. तसेच राखीव पोलीस निरीक्षक / ठाणेदारांनी स्वत: लक्ष देणे जरुरीचे राहील. पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी निवासस्थान ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासुन त्यांचा घरभाडे भत्ता बंद करण्यात यावा. तसेच **शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक घभाव-२०२२/प्र.क्र.-७/सेवा-५, दिनांक १९/०१/२०२३ अन्वये पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या वेतनातुन नियमाप्रमाणे दरमहा अनुज्ञप्ती शुल्क कपात करण्यात यावी.**

| अ.क्र. | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुक | मागणी करण्यात आलेले शासकीय निवासस्थान/बदली शासकिय निवास्थान |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती कल्पना सुनिल बारवकर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) | पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर | पोलीस मुख्यालय अंतर्गत अधिकारी **शासकिय निवासस्थान क्र.०२ (गुलमोहर)** वाटप करण्यांत येत आहे. |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस